Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - III
July - September - 2020
English Part - II / Marathi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

(12)

2019-22

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

ENGLISH PART - II / MARATHI

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Shaukat Stayed**
Principal,
Arts and Science College,
Patoda, Beed.

**Dr. Kalpana Gharge**
HOD & Professor,
Dept. of Public Administration,
Arts and Science College,
Patoda, Beed.

**Dr. Maharudra Gavhane**
Librarian,
Arts and Science College,
Patoda, Beed.

**Dr. Madan Shinde**
Dept. of Economics,
Arts and Science College,
Patoda, Beed.

**Dr. Bandu Lokhande**
Dept. of Political Science,
Arts and Science College,
Patoda, Beed.

**Assi. Prof. Vinod Kirdak**
Dept. of English,
Arts and Science College,
Patoda, Beed.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | दक्षता समितीचे सक्षमीकरण आणि नुतनिकरण एक काळाची गरज<br>**प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील** | ५५-५९ |
| १३ | लोकसाहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा संबंध<br>**प्रा. डॉ. विनोद यू. भालेराव** | ६०-६५ |
| १४ | महाराष्ट्र राज्यातील भुमी उपयोजनातील बदलाचा भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. देशमुख एस. बी.** | ६६-६९ |
| १५ | लोकप्रशासन व माहिती तंत्रज्ञान<br>**डॉ. आरडले एस. डी.** | ७०-७४ |
| १६ | कोरोनोत्तर जग आणि मराठी साहित्य<br>**प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे** | ७५-८० |
| १७ | ग्रामीण क्षेत्रातील बालकामगारांच्या समस्या आणि शासनाची भूमिका<br>**प्रा. डॉ. गजेंद्र एम. कढव** | ८१-८५ |
| १८ | कोरोना महामारी आणि आपत्ती व्यवस्थापन<br>**प्रा. डॉ. मीरा विठ्ठलराव फड** | ८६-८९ |
| १९ | वाचन संस्कृतीचा ऱ्हास आणि ग्रंथालयांचे योगदान<br>**प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत** | ९०-९४ |
| २० | भारतातील लैंगिक असमानता : समस्या, कारणे आणि उपाय<br>**मंदाकिनी निहिते**<br>**डॉ. बी. एम. कऱ्हाडे** | ९५-९८ |
| २१ | सामाजिक जागृतीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान<br>**प्रा. डॉ. गव्हाने महारुद्र प्रभु** | ९९-१०१ |
| २२ | कोरोना व समुह संसर्ग<br>**डॉ. कांतीलाल डी. सोनवणे** | १०२-१०५ |
| २३ | मावेजा कथा संग्रहातील शेतकऱ्यांच्या दु:खाची जाणीव<br>**प्रा. प्रधान रामकृष्ण ज्योतिबा** | १०६-११३ |

# ११. सामाजिक जागृतीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान

प्रा. डॉ. गव्हाने महारुद्र प्रभु
कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाचा विकास हा त्यामध्ये भांडवली गुंतवणूक किती प्रमाणात होते यावर अवलंबून नसून त्या देशातील लोकांची, समाजाची शिकण्याची आणि ज्ञान घेण्याची किती जिज्ञासा आहे ती कशी आहे. यावर अवलंबून असतो. तंत्रज्ञान, शोध आणि माहिती आधारीत अर्थव्यवस्था निर्माण होत असुन त्यामध्ये ग्रंथालय महत्वपुर्ण भूमिका घेऊन विकासाची वाटचाल तयार करु शकते. सार्वजनिक ग्रंथालय ही शिक्षण, संस्कृती व माहितीचा स्त्रोत असुन ती आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि शांततेचे प्रतिक आहे. सार्वजनिक ग्रंथालय ही स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विकास कार्यात सहभागी होऊन राष्ट्र विकासाचा आधारस्तंभ होतात. s

१९६० नंतर ग्रंथालय क्षेत्रात प्रगतीला सुरुवात झाली १९६७ साली ग्रंथालय कायद्याची निर्मिती व १९६८ साली अधिनियम तयार होऊन अमलात आले. लोकशाहीत सामाजिक जाणिव जागृती निर्माण व्हावी तसेच माहिती व ज्ञान मिळविण्याचे केंद्र म्हणूनही ग्रंथालयाच्या निर्मितीकडे जनतेत चढाओढ सुरु झाली. एका ध्येयाप्रती समर्पित होऊन त्याकाळात या ग्रंथालयाच्या निर्मितीला वेग येऊ लागला. वाचन संस्कृतीची वाढ व्हावी, समाज प्रबोधन व्हावे, जनजागृती व्हावी म्हणूनच त्यावेळी सेवाभावी संस्थानी पुढे येऊन ग्रंथालयाच्या स्थापना केल्या.

**गाव तिथे ग्रंथालय**

समाजातिल सामान्यातल्या सामान्य माणसाची वाचनाची भूक भागविणारी आणि वाचकाची भूक वाढविणारी संस्था म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय. समाजातील प्रत्येक व्यक्ति शहाणी, समजदार, विचारी आणि चांगल्या वाईटाची जाण असलेली व्यक्ति निर्माण करण्याची जबाबदारी सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतून निर्माण होते. म्हणून गाव तेथे ग्रंथालय आणि वाचक तेथे वाचनालय. वाचनालयातून मानवाला ज्ञान मिळते. ज्ञान जसजसे वाढत जाते त्याच प्रमाणात सामर्थ्य वाढते. हे सर्व ग्रंथालयामधुन मिळते अशी ज्ञानाची भांडारे असणारी ग्रंथालयेच मानवी जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणू शकतात. बालवाचकांमध्ये वाचनाच्यासवयी निर्माण करुन त्यांचा विकास करणे तसेच सार्वजनिक ग्रंथालयामार्फत व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शने सांस्कृतिक मेळावे घेऊन समाजाचे सांस्कृतिक वैभव वाढवू शकतात.

**ग्रंथालय चळवळ**

अनेक चळवळीबरोबर ग्रंथालय चळवळ ही महत्वाची आहे. जवळजवळ १९ व्या शतकापासून ग्रंथालय चळवळीला सुरुवात झाली. जेव्हा पारतंत्र्यातील चळवळ सुरु झाली तेव्हापासून समाजात जनजागृती व उद्बोधन म्हणूनही बडोदा व कोल्हापूर संस्थानात या चळवळीने मुळ धरले. सयाजीराव गायकवाड यासारख्या दृष्ट्या राजाने मध्यवर्ती ग्रंथालय, ग्राम ग्रंथालय, जनता ग्रंथालय अशी साखळी निर्माण केली व यास पुर्णतः राजश्रय दिला. सामाजिक परिवर्तनाच्या मार्गात ग्रामिण भागात समता प्रस्थापित करण्यासाठी धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अडसर असतात. हे दूर करण्यासाठी ग्रंथालये देवालयापेक्षाही महत्वाची भूमिका बजावतात. शासनामार्फत अनेक लोककल्याणकारी योजना राबवल्या जातात. परंतु निरक्षरतेमुळे त्या लोकांपर्यंत पोहचत नाहीत म्हणून ग्रंथालयामार्फत समाजाला साक्षरतेविषयीचे महत्व पटवून देऊन वैचारिक परिवर्तन करण्यासाठी ग्रंथालय चळवळ महत्वाची भुमिका बजावते.

वाचनसंस्कृती वाढावी, तिचा विकास व्हावा ती वृध्दींगत व्हावी हे कार्यच खरेतर तत्वत: सार्वजनिक ग्रंथालयाचे आहे. भारत हा खेड्यांनी मिळून बनलेला देश आहे. भारतातील ७०% जनता ग्रामिण भागात राहते. ग्रामिण भाग हा देशाचा

विकास हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होय. ग्रामिण आत्मा आहे. खरा भारत खेड्यात नांदतो म्हणून ग्रामिण भागाचा विकास हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होय. ग्रामिण सुधारणा चळवळ ही सातत्याने कार्यरत असणे आवश्यक आहे. अनेक समाजसुधारकांनी चळवळीच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टीकोणातून डोळसपणे पाहण्याची वृत्ती जनतेमध्ये निर्माण करण्यासाठी ग्रामिण भागात ग्रंथालयाचे जाळे पसरविणे महत्वाचे आहे. जीवनाची जाणिव निर्माण करुन देण्याचे काम वृत्तपत्र करतात. माणसातील अज्ञान, अंधश्रध्दा दूर करण्यासाठी ग्रंथ महत्वाचे असतात. ग्रंथ हेच खरे गुरु आहेत. ग्रंथालये वाचकरुपी भक्ताना ग्रंथाच्या माध्यमातून सुरुक्षित ठेवतात. ग्रंथालयामध्ये वैचारिक, सामाजिक, शेती, उद्योग, सहकार, अर्थ, शिक्षणविषयक ग्रंथ तसेच, मासिके, वृत्तपत्रे इत्यादि विषयावरील साहित्य उपलब्ध असते. विशेषत: वृत्तपत्र माणसाच्या जीवनाचा आरसा आहे. जसे काचेच्या आरशातून आपण आपला चेहरा पाहु शकतो तसे वृत्तपत्ररुपी आरशातून आपण अज्ञान, अंधश्रध्दा दूर करुन जगाचे प्रतिबिंब ज्ञानाच्या रुपात पाहु शकतो.

ग्रंथालयाच्या माध्यमातून समाज हे कुटुंब, शरीर आहे. ग्रंथाच्या वाचन, चिंतन व मनन केल्यामुळे धर्माबद्दलच्या आस्था माणसाच्या मनात निर्माण होतात. माणसाबद्दलचा जिव्हाळा वाढीस लागतो. म्हणुन ग्रंथालय हे सामाजिक पावित्र्य निर्माण करणारे मंदिर आहे. ग्रंथालय हे जागतिक ज्ञानाची गुरुकिल्ली होय. लोकशाहीत स्वंयशिक्षणाचे माध्यम व साधन म्हणून ग्रंथालयाकडे पाहिले जाते. "जसे शिक्षणाविना लोकशाही नाही व लोकशाहीविना शिक्षण नाही. व्यक्तिचा व समाजाचा विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट, ग्रंथालयाच्या माध्यमातून साध्य होऊ शकते. म्हणून ग्रंथालयाविना शिक्षण म्हणजे आत्म्याविना शरीर होय." ग्रंथालय हे आजच्या काळात एक प्रभावशाली शक्ती व मर्मस्थान बनले आहे.

**विविध सामाजिक उपक्रम**

सार्वजनिक ग्रंथालयामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. महान व्यक्तिच्या जयंत्या, पुण्यतिथी, राष्ट्रीय सण साजरे केले जातात. दिवाळी अंक वाचनाची स्पर्धा घेतली जाते. यामधून उत्तम वाचक निवडला जातो. त्यांना पारितोषिक दिले जाते. जाहिर कार्यक्रमात प्रथम, द्वितीय, तृतिय येणाऱ्या वाचकांना सन्मानित केले जाते. तसेच वाचकांना आवडणारी विशिष्ट लेखकाची प्रकाशनाची पुस्तके निवडणे यामुळे ग्रंथालयाकडे वाचक जास्तीत जास्त संख्यनेने येतात व वाचनाची आवड निर्माण होते. यामधूनचे वाचक चळवळ उभी राहते. ग्रंथालयामार्फत ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले जाते. ग्रंथप्रदर्शनाचा फायदा विद्यार्थी, सामान्य नागरिक यांना होईल. यामधून वाचकांना नवनविन ग्रंथाची ओळख होते. आदर्श, महान, महान पुरुषाची जीवनचरित्र वाचनात येतील त्याचे जीवन, कार्याची ओळख होईल यामधुनच एक चांगला आदर्श समाजात प्रथापित होईल.

ग्रंथालयामार्फत व्याख्यानमाला आयोजित करुन त्याचा फायदा जनतेला करुन दिल्या जातो. तसेच जयंती व पुण्यतिथीच्या निमित्ताने वक्तृत्वस्पर्धा आयोजित करुन प्रथम, द्वितीय, तृतिय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देऊन गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन वाचन अभिरुची वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. वाचनसंस्कृती वाढावी, तिचा विकास व्हावा, ती वृध्दीगत व्हावी यासाठी ग्रंथालयाकडून प्रयत्न केले जातात. वाचनसंस्कृती रुजविण्याचे प्राध्यापक शा. शं. रेंगे यांनी अत्यंत सुत्रबध्द मत मांडले आहे. "जो वाचत नाही त्याला वाचायला लावणे व जो वाचतो त्याला चांगले वाचायला लावणे व जो चांगले वाचतो त्याला अधिक चांगले वाचावयास लावणे अशी वाचनाची आवड लागली की पुस्तकाची संगत सुटत नाही."

ग्रंथालयामार्फत 'वाचनसंस्कृती विकास अभियान' राबवून तळागाळातील वाचकापर्यंत आधुनिक मूल्याची जोपासना करणाऱ्या साहित्याची पुस्तके वाचकापर्यंत पोहचून वाचनाची आवड निर्माण करण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करतात. वाचनसंस्काराचा खरा पगडा बालमनावर असतो. त्यांना देशातील थोरामोठ्यांची चरित्र वाचावयास दिले जाऊन त्यामध्ये राममनोहर लोहिया, राजाराम मोहन रॉय, रामस्वामी पेरीयार, महात्मा फुले, रानडे, शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लाला लजपतराय, गाडगे महाराज, छ. शाहू महाराज, एक होता कार्व्हर अशा सुधारकांची पुस्तके वाचल्यानंतर त्यांच्या मनात आदर्श निर्माण होतो. त्यांच्या व्यक्तिमत्वात सुधारणा होते. सामाजिक मूल्याची माहिती होते. म्हणजेच सार्वजनिक ग्रंथालयातून मूल्यशिक्षण मिळते. मूल्यशिक्षणतून बुध्दीवादी, प्रज्ञाशील, करुणामय व्यक्तिमत्वाचा मानव निर्माण

करणे होय. यामधून ग्रामिण भारताच्या विकासात व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यात व ती टिकवण्यात ग्रामिण भागातील ग्रंथालये लोकशाही भारताचे आधारस्तंभ म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतात.

## सारांश

एकविसाव्या शतकात समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान महत्वाचे आहे. सार्वजनिक ग्रंथालयाकडून जे विविध उपक्रम राबविले जातात त्यामध्ये प्रामुख्याने ग्रंथप्रदर्शन, महापुरुषाच्या जयंत्या, पुण्यतिथी, वक्तृत्व स्पर्धा इ. यामधुन खऱ्या अर्थाने वाचक ग्रंथ वाचनासाठी ग्रंथालयात येतो. वाचनसंस्कृतीत वाढ होते. संस्कृतीचे जतन होते. ग्रंथ हे संस्कृतीचे मस्तक मानले जाते. जागतिक संस्कृतीचा ठेवा ग्रंथात साठविलेला आहे. हा ठेवा ग्रंथालयात साठवून ठेवलेला आहे. यामधून व्यक्ति विचारी, शहाणी, समजदार बनते आणि यामधूनच समाजाची प्रगती होते. त्याला मिळालेल्या ज्ञानाचे रुपांतर तो आपल्या सामर्थ्यात करतो. त्यामुळे त्याचे जीवन समृध्द होण्यास मदत होते. म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाचे सामाजिक जागृतीसाठी योगदान आहे.

## संदर्भ

१) आर्विकर भा.बा., वाचनसंस्कृती आणि ग्रंथालय चळवळ, ग्रंथपरिवार, परभणी. जुलै-आगस्ट, २००७.
२) गौरी, भालचंद्र., सार्वजनिक ग्रंथालये, गोमंतक, पणजी, २८ मे २०१८.
३) जनबंधु, शि.प., वाचनसंस्कृती आणि ग्रंथालय चळवळ, एक आलेख, ग्रंथपरिवार, परभणी, जानेवारी २००७.
४) जाखडे, अरुण., वाचनसंस्कृती आणि प्रकाशन व्यवसाय, प्रतिष्ठान, औरंगाबाद, एप्रिल-जुन २००७.
५) देशपांडे श्रीराम., महाविद्यालयीन ग्रंथपालांचा सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत सहभाग, ज्ञानगंगोत्री. य.च.म.मु.वि.नाशिक, नोव्हेंबर २००१.
६) नरगुंद, रेवती., ग्रंथालय आणि सामाजिक विकास, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन, जाने. २००२. पृ.९८-१००
७) पवार, रामेश्वर., आणि सातारकर सु.प्र.सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे लोकशिक्षण संप्रेषणाचा चिकित्सक अभ्यास, ग्रंथपरिवार, परभणी, आक्टो.-डिसें. २००६.
८) बाहेती एस. आर. आणि जोशी मितल., सार्वजनिक ग्रंथालयातील बहि:शाल कार्यक्रमाचे विश्लेषणात्मक अध्ययन, ग्रंथपरिवार, परभणी, फेब्रु. २००७
९) लोहकरे, रोहिदास सदाशिव., ग्रंथालयातील विविध उपक्रम, शिक्षण संक्रमण, मरामावउच्चमाशिमंडळ, पुणे, जाने.२००६
१०) हिंगलासपुरकर, सुदेश., वाचनसंस्कृती आणि वाचक चळवळ, प्रतिष्ठान, औरंगाबाद, एप्रिल-जुन २००७.